# Model Answer
## Set- I
**Std. – 10th EM**
**Subject – Marathi L.L.**



**Time : 3 Hrs.** **Marks : 80**

### विभाग – १ पठित गदय

**प्र.१ अ) उतारा-याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा:**

**१) एका शब्दात उत्तरे लिहा.**

अ) २००४ साली आ) मित्राकडे

२) योग्य पर्याय निवडून लिहा.

i) लेखकानी अशक्त, म्हाता-या भिक्षेक-याला दोन शाली दिल्या कारण थंडीपासून रक्षण व्हावे म्हणून.

**ii) खालील कृती योग्य की अयोग्य ते लिहा.**

अ) योग्य आ) योग्य

**३) स्वमत :**

माझ्या पाचव्या वाढदिवसापर्यंत माझा इतरांसारखा वाढदिवस साजरा होत असे. पेन, पेन्सिली, पुस्तके, खेळणी, कपडे अशा खूप वस्तू मला भेट म्हणून मिळत. केक, रिटर्न गिफ्ट, बर्थडे पार्टी पण त्यानंतर मात्र हे सारे बंद झाले. त्यानंतर आई वाढदिवसादिवशी औक्षण करते. सर्वांचे आशीर्वाद घेऊन झाल्यावर मी, आई-बाबांबरोबर 'वात्सल्य ट्रस्टमध्ये जातो. बाबा अगोदरच तिथल्या मुलांसाठी कपडे, खाऊ, खेळणी आणून ठेवतात. भेटवस्तू, कपडे, खाऊ मिळाल्यावर ती मुले खूप खुश होतात. दिवसभर मी त्या मुलांसोबत राहतो. दरवर्षी आम्ही न चुकता 'वात्सल्य ट्रस्टमध्ये जातो. तसेच समोरच्या गरीब वस्तीतील मुलांना भेट म्हणून आलेल्या वस्तू देतो.
आता मला या गोष्टीची एवढी सवय झाली की केवळ 'वात्सल्य ट्रस्ट' मध्ये जायला मिळते म्हणून मी वाढदिवसाची वाट पाहतो. बाबा तर नवीन वस्तू आणतातच पण मी सुद्धा माझे खेळ, त्यांच्यासाठी ग्रीटींग कार्ड घेऊन जातो. हळूहळू माझी संकल्पना माझ्या मित्रपरिवारामध्येही पसरू लागली आहे. ते सुद्धा त्या मुलांना देण्यासाठी त्यांचे चांगले कपडे, खेळ माझ्याकडे देतात. त्या मुलांना भेटून आल्यावर मला मात्र खूप बरं वाटतं. दुस-याला देण्याचा आनंद माझे मन सुखावत असतो. खरंच देण्यातील आनंद प्रत्येकाने एकदातरी अनुभवावा, असेच सर्वांना सांगावे असे मला वाटते.

**प्र.१ आ) पुढील गदय़ उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा:**

**१) आकृती पूर्ण करा:**

१) आता तुम्ही कुठून आलात? २) आठवड्यातून तुमचे फिरणे किती होते?
३) तुम्ही एकटेच ये – जा करता का? ४) तुम्ही काही झाडे लावली आहेत का?

**२) शब्दजाल पूर्ण करा:**

अ) पायपुसणीच्या आकाराचा आभाळाच्या निरभ्र तुकड्यासारखा एक निळा चौकोन

आ) निळ्या तुकड्याच्या मधोमध चंदेरी वर्खात मढलेली दोन पावले.

**३) स्वमत:**

आजचे युग हे यंत्रयुग आहे. आधुनिक तंत्रज्ञान वापरणे, हे मानवी समाजाला अटळ आहे. मानवी सेवेसाठी तंत्रज्ञानाने वेगवेगळे ॲप शोधून काढले आहेत. पर्यावरण आपण किती प्रदूषित करतो व ते कसे निकोप ठेवावे, यासाठी 'फूटप्रिन्टस ॲप' कार्यरत आहे. वायूप्रदूषण ही आजची फार मोठी समस्या आहे, नव्हे ती आपत्तीच आहे. वायूप्रदूषणामुळे आरोग्य धोक्यात आले आहे, वायूप्रदूषण होऊ नये म्हणून आपण स्वतः किती काळजी घ्यावी, हे लक्षात येण्यासाठी 'फूटप्रिन्टस ॲप' चा उपयोग करणे, श्रेयस्कर आहे. ठिकाण जवळ असेल तर

चालत जाणे सोयिस्कर ठरावे. वायू प्रदूषित करणारी वाहने टाळावीत व शक्यतो हवेवर चालणाच्या वाहनांचा वापर करावा. अशी शिकवण आपल्याला हे 'फूटप्रिन्टस' ॲप देते.

## अपठित गदय

**प्र.१ इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा:**

**१) ओघतक्ता पूर्ण करा.**

१) दोघांची भेट झाली. २) दोघेही खुर्च्यांवर शांत बसून राहिले.

३) एकमेकांशी अवाक्षर बोलले नाहीत. ४) तासाभराने भेटीला आलेला विद्वान उठला.

**२) पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

i) अध्यात्म क्षेत्रातील गुरूशिष्य आणि एकाच ध्येयाचा व कलेचा ध्यास घेतलेले उत्कट साधक.

ii) विद्वान यजमानांना म्हणाले.

## विभाग २ : पदय

**प्र.२ अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१) संकल्पना स्पष्ट करा.**

i) आभाळाच्या छत्राखाली (आभाळाच्या आधाराने / निसर्गाच्या आश्रयाने निर्माण झालेली सृष्टी) असणारी सृष्टी एक अनोखी तृप्तता मनाला देते.

ii) झाडांची सळसळणारी पाने व वा-याच्या झुळकेचा होणारा मुलायम असा स्पर्श.

**२)** i) फुला फुलांचे दाट ताटवे ii) दृष्टी – सृष्टी / पुष्टी – वृष्टी

**३) शब्दांचा अर्थ लिहा.**

अ) पुष्टी – बळ, मदत ब) तुषार – पाण्याचा थेंब

क) दौलत – पैसा, धन ड) तृष्टी – तृप्त, खुश

**४)** निसर्ग सौंदर्याच्या विलोभनीय आविष्कारातच जगण्याचा खराखुरा आनंद मिळेल असा दृष्टिकोन 'रंग मजेचे, रंग उदयाचे' या कवितेत कवयित्रीने मांडला आहे. आनंदमयी उदयासाठी प्रत्येकाने आपल्या कुवतीनुसार पर्यावरणाची जोपासना केली पाहिजे. सृष्टीतील नानाविध रंगांचे विश्व टिकवले पाहिजे. येथील निसर्गाशी, मातीशी आपले एक नाते आहे. नात्याचे हे संबंध बळकट करण्यासाठी प्रत्येकाने जागरूक राहणे आवश्यक आहे. निसर्गातील नानाविध रंगांमुळे प्रसन्न असे वातावरण आपोआप निर्माण होते. प्रसन्न अशा वातावरणात समाधानाने, आनंदाने, जीवनाची मजा घेत घेत जगणे फारसे अवघड नाही. त्यासाठी आज थोड्याशा प्रयत्नांची आवश्यकता आहे. फुलाफुलांचे ताटवे फुलविणे हे आपल्याच हातात आहे. आपल्या मातीमध्ये राबून सर्वांसाठी अन्नधान्य आपणच निर्माण करायचे आहे. रुक्ष डोंगरांवर, ओसाड माळरानांवर बिया उधळून घनदाट झाडे निर्माण करणे अशक्य नाही. आभाळाखाली असण्याऱ्या निसर्गसौंदर्यामध्येच मनाला तृप्ती देण्याचे सामर्थ्य आहे.

रंग उदयाचे म्हणजेच भविष्याचे. आपल्या भविष्याची अधिक चांगली बांधणी करण्यासाठी सर्वांनी वचनबद्ध राहिले पाहिजे. निसर्गातले हे नानाविध रंगांचे वैभव आपण नक्कीच निर्माण करू शकतो. आनंदाने जगण्यासाठी म्हणजेच 'रंग मजेचे' अनुभवण्यासाठी आपल्या पर्यावरणाची जाणीवपूर्वक जोपासना आपण केली पाहिजे. उदया मजेने जगण्यासाठी आज जे काही करण्याची आवश्यकता आहे ते दर्शवणारी प्रस्तुत

कविता आहे. कवितेचे शीर्षक सर्वार्थाने योग्य असेच आहे.

प्र.२ **आ) 'दोन दिवस' व 'हिरवंगार झाडासारखं' या दोन कवितांपैकी कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील मुद्दयांना अनुसरून कृती सोडवा.**

**'दोन दिवस'** –

१) प्रस्तुत कवितेचे कवी – नारायण सुर्वे.

२) कवितेचा विषय – कष्टकरी कामगारांच्या आयुष्यातील दाहक वास्तवाचे चित्रण या कवितेत आले आहे.

३) कवितेतून मिळणारा संदेश – कामगारांचे दु:खद, विदारक चित्र या कवितेत रेखाटले आहे. त्याचबरोबर दु:खाने पिचलो नाही, पुन्हा ठामपणे उभा राहिलो, हा ठाम आशावादही इथे व्यक्त झाला आहे. दु:खावर विजय मिळवावा, अशा निर्धाराचा मंत्र ही कविता सांगते.

४) कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण – ही कवीता मला भावली. या कवितेत कामगारांच्या कष्टमय जीवनाचे वास्तव व विदारक चित्र प्रत्ययकारी चित्रात रेखाटले आहे. त्याचबरोबर 'दु:ख पेलावे, पुन्हा जगावे' यातून दु:ख पचवून पुन्हा मानाने जगावे, असा दुर्दम्य आशावाद व्यक्त झाला आहे. दु:ख आपलेसे करुन कणा मोडू न देता जगण्याचे सूत्र या कवितेतून मिळते.

५) शब्दांचा अर्थ –

अ) हरघडी – क्षणा-क्षणाला ब) डोईवर – डोक्यावर क) दारिद्र्य – गरिबी ड) सहाय्य - मदत

**'हिरवंगार झाडासारखं '**

१) प्रस्तुत कवितेचे कवी – जॉर्ज लोपीस

२) कवितेचा विषय – माणसाने आपले आयुष्य झाडासारखे जगावे, हे सूत्र या कवितेतून मांडले आहे.

३) कवितेतून मिळणारा संदेश – कवी जॉर्ज लोपीस यांची ही लिहीलेली कविता आहे. झाडाचे महत्त्व, झाडाची सहनशीलता, परोपकारी वृत्ती, संकटात ठाम उभे राहण्याची जिद्द या गुणांची महती या कवितेतून अधोरेखित होते.

४) कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण – 'झाड' हा निसर्गाचा एक घटक आहे. झाडाची परोपकारी वृती, दानशूरता, आनंदी वृत्ती हे गुण मानवाने आत्मसात करावेत, हे ही कविता सांगते. विविध गुणांनी संपन्न असलेल्या वृक्षासारखे तुम्ही व्हा, हे सहजपणे सांगणारी ही कविता मला भावते.

५) शब्दांचा अर्थ – अ) संथ – शांत ब) मुसाफिर – फिरस्ता क) वस्त्र – कपडा ड) रक्त - रुधिर

## विभाग ३ : स्थूलवाचन

**प्र.३ खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.**

**१)** 'जाता अस्ताला' या कवितेमध्ये सूर्य व पणती ही दोन्हीही प्रतीके तेजाचे, धैर्य हे तेजाचे नैसर्गिक प्रतीक आहे. तर पणती हे मानवनिर्मित प्रतीक आहे. अनेक वर्षे सूर्य हा आकाशात तळपत आहे नि तो या पृथ्वीवरील चराचराला ऊर्जा, प्रकाश व चैतन्य अविरतपणे देत आहे. सूर्यप्रकाशामुळे मानवी जीवन फुलले आहे. सूर्याने मानवी तनामनाला कायम उजळत ठेवले आहे. पणती हे सूर्याचे अपत्य आहे. ते महाप्रचंड तेजाचे छोटेसे रूप आहे. स्वत:च्या क्षमतेनुसार पणतीही अंधार दूर करण्याचे कार्य करीत आहे. सूर्य अस्ताला गेल्यानंतर मानवी जीवन उजळत ठेवण्याचे व्रत पणतीने अंगिकारले आहे. त्यामुळे महातेजोगोलाइतकाच तिचाही त्याग महत्त्वाचा आहे दोन्ही प्रतीकांतून 'स्वत: जळत राहून जगाला प्रकाश देण्याचा संदेश आपणास ही कविता देते.

**२)** डॉ. होमी भाभा यांच्या मते, स्वत:चे काम निर्माण करणे व काय काम करावे, हे स्वत:च ठरवणे हा सकारात्मक विचार प्रत्येकाने करायला हवा. बॉसने सागितले तेवढेच काम करणे, ही कोती प्रवृत्ती आहे. चिंता करीत न

बसता, कार्यरत व कार्यमग्न झाले की स्काय इज द लिमिट ही परिस्थिती निर्माण होते. कोणीतरी बोट धरून चालवेल, मार्ग दाखवेल ही स्थिती आरंभी ठीक आहे. परंतु शेवटी स्वत:चे मार्ग स्वतः शोधणे, ऊर्जा मिळवणे व कार्यात सक्षम होणे हे ध्येय असावे. यालाच 'स्काय इज द लिमिट' असे म्हटले आहे.

३) पाणी हे पृथ्वीवरचे अमृत आहे. ते चराचराचे संजीवन आहे. पृथ्वीवरील सजीव-निर्जीव सृष्टीला पाण्याची अत्यंत आवश्यकता असते. पशु-पक्षी, प्राणी व मानवी जीवन पाण्याशिवाय कोमेजून जाईल. निसर्ग हिरवागार करण्याची किमया पाण्यामध्ये आहे. पाण्यामुळे गाई-गुरांना हिरवा चारा मिळतो. तर पाण्यामुळे मानवाचे अन्नधान्य शेतात उगवते. चराचरातील प्रत्येक घटकाची तहान शमवण्याचे सामर्थ्य पाण्यातच असते. पाणी नसेल तर ही पृथ्वी भकास, ओसाड व वैराण होईल, 'पाणी हेच जीवन' हा मानवी इतिहासाचा मूलमंत्र आहे.

## विभाग ४ : भाषाभ्यास

**प्र.४ अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती.**

**१) पुढील वाक्यांचे प्रकार ऒळखा.**

अ) आज्ञार्थी वाक्य ब) विधानार्थी वाक्य.

**२) वाक्यरूपांतर :**

i) लठ्ठपणा आपल्या हातात नाही.

ii) त्याचा काय उपयोग होणार?

**३) खालील वाक्यप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

| वाक्प्रचार | अर्थ | वाक्य |
|---|---|---|
| i) हर्षभरित होणे | खूप आनंद होणॆ. | चित्रकलेच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक आल्याचे ऎकून माधव हर्षभरित झाला. |
| ii) ध्यास घेणे | इच्छा पूर्ण करण्याचा प्रयत्न करणे. | वार्षिक परिक्षेत प्रथम क्रमांक मिळवण्याचा राहूल ने ध्यास घेतला. |
| iii) स्तंभित होणे | आश्चर्यचकित होणे. | परदेशातून खूप वर्षांनी अचानक परत आलेल्या मुलाला पाहून आई स्तंभित झाली. |

**प्र.४ आ) भाषिक घटकांवर आधारित कृती.**

१) i) पुढील शब्दांचे समानअर्थी शब्द ऒळखून लिहा.

अ) अंधार - तम ब) आनन - चेहरा

**ii) खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा.**

अ) पशू – पक्ष्यांबद्दलचे प्रेम - **भूतदया**

**iii) विरूद्धार्थी शब्द लिहा.**

अ) निस्वार्थी × स्वार्थी ब) मित्र × शत्रू

**iv) पुढील शब्दांचे वचन बदला.**

अ) तिकिट – तिकिटे ब) भेट – भेटी

**२) i) अचुक शब्द ऒळखा.**

अ) जाज्वल्य, जाजवल्य, जाजव्ल्य, जाज्वलय = जाज्वल्य ब) कीरती, किर्ती, कीर्ती, किरथी = किर्ती

**३) विरामचिन्हे.**

**i) खालील वाक्यातील विरामचिन्हे ओळखा व त्यांची नावे लिहा.**

अ) "अन्वर जेवला?" = i) दुहेरी अवतरण चिन्ह ii) प्रश्नचिन्ह

ब) फारच भयंकर! कल्पना येत नाही. = i) उद्‌गारवाचक चिन्ह ii) पूर्णविराम

**विभाग ५: उपयोजित लेखन**

**प्र.५ अ) पुढील कृती सोडवा:**

**१) पत्रलेखन :**

दिनांक २१ एप्रिल, २०१८

प्रति,

मा. श्री. विनय गायकवाड

विनय ॲकॅडमी

२ए सोमवार पेठ, कराड.

**विषय : सुलेखन वर्गात प्रवेश मिळणेबाबत.**

महोदय,

मी सरस्वती हायस्कूलचा विदयार्थी आहे. वर्तमानपत्रात आपण दिलेली जाहिरात वाचून मी हे विनंतीपत्र आपणास लिहित आहे.

आपण अतिशय माफक फी मध्ये १ मे ते ३१ मे या कालावधीत आपल्या विनय ॲकॅडमी मार्फत मराठी सुलेखन वर्गाचे आयोजन केले आहे. हा उपक्रम खरोखरच फारच स्तुत्य आहे. कारण आजकालच्या ब-याच मुलांची हस्ताक्षरे फारच वाईट आहेत.

आपल्या या सुलेखन वर्गामुळे माझ्यासारख्या अनेक विदयार्थ्यांना याचा फायदा होईल यात शंकाच नाही. उन्हाळी सुट्टीतच हा वर्ग चालणार असल्यामुळे सुट्टी सत्कारणी लागेल व अक्षरही सुधारेल व एक नवीन कला आत्मसात केल्याचा आनंदही गवसेल या हेतूने या सुलेखन वर्गात प्रवेश घेण्याची माझी खूप इच्छा आहे.

तरी कृपया आपल्या सुलेखन वर्गात मला प्रवेश द्यावा ही नम्र विनंती. मी नियमित या वर्गात हजर राहीन.

तसदीबद्दल क्षमस्व.

आपला विश्वासू

अ.ब.क. विद्यार्थी

सरस्वती विदयामंदिर,

५, बुधवार पेठ, कराड.

पिन – ४२३००२

abcdef@gmail.com

**२) सारांश लेखन:**

दोन विद्वान माणसे एकमेकांना भेटले, अवाक्षरही न बोलता शांतपणे बसुन राहिले. तासाभराने दोघेही उठले व एकमेकांना वेळ खूप छान गेला असे म्हणाले. तासभर एकमेकांशी न बोलता संवाद करणारे हे विद्वान म्हणजे विद्वान या संकल्पनेची परमोच्च अवस्था म्हटली पाहिजे. दोन जिवलग, अध्यात्मक्षेत्रातील गुरुशिष्य, एकाच ध्येयाचा, कलेचा ध्यास घेतलेले साधक हेच 'शब्देविण संवादिजे' अवस्थेपर्यंत जाऊ शकतात.

**प्र.५ आ) पुढील कृती सोडवा.**

**१) खाली दिलेल्या मुद्दयांच्या आधारे कथा तयार करा.**

एका जंगलत एक खूप जुने वडाचे झाड होते. झाडावर अनेक कावळे गुण्यागोविंदाने राहत असत. त्यांच्यामधील एक म्हतारा कावळा या सर्व कावळ्यांना सांभाळात असे. सारेच या कावळे आजोबांचा मान ठेवत असत. त्यांनी सांगितलेली प्रत्येक गोष्ट ऎकत. एका फांदीवर कावळ्यांची बाजारपेठ भरत असे. तेथे अनेक कावळे दुकानदार गरजेच्या वस्तू विकत असत. दर रविवारी सकाळी ही बाजारपेठ भरत असे. आपल्याला हव्या असलेल्या वस्तू इतर कावळे विकत घेत असत.

एकदा एक चिमणी त्या झाडावर आली व कावळेआजोबांना म्हणाली, “तुमचे हे झाड तर ब-याच लोकवस्तीचे आहे. मी एका माठातून मध आणला आहे. तो मी इथे विकू शकते का? त्यावर कावळेआजोबा म्हणाले, “ अगं चिऊताई, आमच्याकडे कोणीही मध विकत घेणार नाही. तू आपली त्या फुलपाखरांच्या झाडावर जा, तिथे तुझा हा मध चांगला खपेल.” चिमणी गयावया करत म्हणाली, “ माझ्याकडचा मध खूपच गोड आहे अन् तो मी ताजा ताजा काढून आणला अहे. थोडी चव तर बघा.” कावळेआजोबा म्हणाले, “बरं बाई, तुझ्या मनासारखे होऊ दे.” चिमणीनी आणलेला मध पानांच्या द्रोणांमध्ये सुंदर रीतीने मांडला व ती त्या मधाचे गोडवे गाणारे सुंदर गाणे म्हणू लागली.

मधाचे माझ्या मोल<br>
कोणा नाही कळायचे<br>
एकदा खाऊन पाहाल<br>
तर पुन्हा वळायचे

खरेच ते गाणे सुंदर होते. झाडावरचे सारे कावळे तिचे गाणे ऎकण्यासाठी थांबत होते; पण मध कोणीच विकत घेत नव्हते. संध्याकाळपर्यंत चिमणी गाणे म्हणून म्हणून थकली; पण तिचा मध विकला गेला नाही. ती खूपच दु:खी झाली व कावळेआजोबांकडे गेली आणि म्हणाली, “आजोबा, कसले हो कावळे? एकानेही मध साधा चाखला नाही. माझा घसा मत्र दिवसभर गाणे गाऊन दुखू लागला.” यावर कावळेआजोबा म्हणाले, “कावळ्याला मधाची चव काय?” कावळ्याचे खाणे तर तुला माहित आहेच; म्हणून मी तुला सकाळी मध विकायला परवानगी देत नव्हतो. त्याऎवजी तू त्या फुलपाखंराच्या झाडावर आपला मध चांगला खपवला असतास. आता लक्षात आले का? जेथे जे खपते, तेथेच विकावे.

**तात्पर्य :** जेथे जे खपते, तेथेच विकावे.

२) **जाहिरात लेखन.**

i) १) जिवाचा विरंगुळा    २) कलांचा विसावा

ii) १) ८ ते १५ वर्ष    २) दि. १५ मे ते २० मे

iii) प्रथम येणा-यास प्रथम प्रवेशाची संधी या छंदवर्गात देण्यात येणार आहे.

३)

| |
|---|
| **लोकपत्र**<br>**वसुंधरा दिन उत्साहात साजरा**<br>**वसुंधरा दिनानिमित्त वृक्षदिंडी व वृक्षारोपण कार्यक्रम,**<br>**वनाधिकारी मा. श्री. शशीकांत राव यांच्या**<br>**उपस्थितीत संपन्न**<br>दि. २६ जून, २०१८<br>आमच्या प्रतिनिधीकडून<br>दिनांक २५ जून २०१८ रोजी ज्ञानसाधना विद्यालयाच्या वतीने वसुंधरा दिनानिमित्त वृक्षदिंडी व वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. वनाधिकारी मा. श्री. शशिकांत राव यांनी या कार्यक्रमाचे अध्यक्षपद भूषवले. वृक्षारोपण कार्यक्रमाचे उद्घाटन त्यांच्या शुभहस्ते झाल्यानंतर शाळेतील सर्व विद्यार्थीवर्गासोबत ते स्वतः वृक्षदिंडीत सहभागी झाले. आपल्या अध्यक्षीय भाषणाद्वारे त्यांनी 'वृक्षाचे संवर्धन ही काळाची गरज' या विषयावर उपस्थितांशी संवाद साधला. प्रस्तुत कार्यक्रमाच्या समारोपसमयी पाहुण्यांसह सर्व उपस्थितांना तुळशीचे रोप देऊन सर्वांचे आभार मानण्यात आले. या अनोख्या आभार भेटीचे संवर्धन प्रत्येकाने करावे यासाठी सामूहिक शपथविधी झाला आणि हा सोहळा संपन्न झाला. |

**प्र.५ इ) पुढील कोणतीही एक कृती सोडवा.**

१) खालील चौकटीतील प्रसंग वाचून त्याआधारे प्रसंगलेखन करा.

दरवर्षी माझा वाढदिवस आमच्या घराच्या गच्चीवर उत्साहात साजरा केला जायचा. मित्रमंडळी, नातेवाईक यांनी घर भरून जायचे. मिळालेल्या भेटवस्तू ठेवायला जागा होत नसे; पण ह्या वर्षी बाबांनी आग्रह केला, की तुझा वाढदिवस आपण वेगळ्या पद्धतीने साजरा करूया. जेव्हा बाबांनी वाढदिवस जवळच्या गावातील अनाथाश्रमात साजरा करूया असे सांगितले, तेव्हा खरं तर मी नाराजच झालो. मी विरोध करायचा प्रयत्न केला; पण बाबा ऐकायला तयारच नव्हते.

शेवटी माझ्या वाढदिवसाचा दिवस उजाडला. संध्याकाळी माझ्या आवडत्या श्रीखंडपुरीचे मोठ्ठे भरलेले डबे घेऊन मी आणि आईबाबा अनाथ आश्रमात जायला निघालो. तिथे पोहोचलो तेव्हा तेथील मुलांनी तिथल्याच बागेतील फुलांनी स्वागत केले. माझे कुतुहल तेव्हा वाढले.

आम्ही आत गेलो. तेथील सभागृह अतिशय साध्या , पण आकर्षक पद्धतीने सजवले होते. छोटी – मोठी अशी जवळजवळ ६० मुले तेथे जमली होती. प्रत्येकाच्या चेह-यावरच नाही, तर एकंदरीतच तेथील वातारवणात खूप आपुलकी भरून राहिली होती. बाबांनी आणलेला केक मी त्या सगळ्या मुलांसोबत कापला आणि त्या सगळ्या मुलांनी एकच जल्लोष केला. बाबांनी न सांगताच मी तेथील एकदोन मुलांना केक भरवला. स्वत:च्या हातांनी बनवलेल्या वस्तू त्यांनी मला भेट म्हणून दिल्या. सुंदर रंगीबेरंगी कागदी फुलांचे गुच्छ, कागदापासून बनवलेले कंदील, जुनी खोकी वापरून बनवलेला रोबोट, अशा अतिशय कल्पक आणि आकर्षक गोष्टी त्यात होत्या. मुलांनी त्यासाठी किती मेहनत घेतली आहे, हे जाणवत होतंच. दरवर्षी भरपूर येणा-या भेटवस्तू मला

त्यासमोर फिक्या वाटल्या.

आईबाबांनी आणि मी रंगीत खडूंच्या पेट्या, कंपास पेट्या, शाळेत न्यायचे डबे आणि पाण्याची बाटली, को-या वह्या अशा अनेक परतभेटींचे (रिटर्न गिफ्ट्स ) त्या मुलांसाठी आणले होते. मी दिलेल्या परतभेटींचे (रिटर्न गिफ्ट्सचे) त्यांना फार अप्रुप वाटल्याचे बघून मला खूप आनंद झाला.

कहीशा जड पावलांनी मी घरी निघालो. या नव्या दोस्तांनीही जड मनानंच माझा निरोप घेतला. माझ्या संस्मरणीय वाढदिवसासाठी मी बाबांचे आभार मानले आणि पुढील प्रत्येक वाढदिवस या मुलांसोबत्त साजरा करण्याचा मनोमन निर्धार केला.

२) **खालील चित्रातील घटक (महामार्गावरील सूचनाफलक ) तुमच्याशी बोलतो आहे अशी कल्पना करा व त्या घटकांचे आत्मकथन लिहा.**

**मी सूचनाफलक बोलतो आहे.**

त्यादिवशी शाळेत जाण्यासाठी बसची वाट बघत मी बसथांब्यावर उभी होते. तिथेच एक कुटुंबही बसची वाट पाहत होते. त्यांची दोन लहान मुलं आपापसात छान खेळत होती. फुटपाथवर त्यांची पकडापकडी सुरू होती. पाहून गंमत वाटत होत्ती; मात्र अचानक फुटपाथवर शिरणा-या भरधाव गाडीला पाहून मनात चर्र झालं. मुलांच्या वडीलांनी प्रसंगावधान राखून मुलांना वाचवंल. हे थरार नाट्य घडताना कोणीतरी जोरात ओरडलं, "अरे, तुम्ही माणसं आहात की प्राणी?" हे कोण बोलंल म्हणून मी इकडे तिकडे पाहिलं तर 'वाहने हळू चालवा, पुढे गतिरोधक आहे' असे लिहिलेला सूचना फलक त्राग्याने बोलत होता.

अरे! मी तरी तुमची प्राण्यांशी तुलना का करतोय? ते प्राणी तुमच्यापेक्षा जास्त शहाणे आहेत. ते शिस्तीने एकामागोमाग चालतात. वाहनांना घाबरतात व त्यामुळे जवळ फिरकत नाहीत. कुणाला नुकसान पोहचवत नाहीत. आपलं आयुष्य जगतात. दुस-यांचे प्राण हिरावत नाहीत. अरे त्यांना शाळा नाहीत, त्यांना वाचता येत नाही; पण तुम्ही...... तुम्ही तर माणसं आहात ना? शाळा शिकता, मोठे अधिकारी होता मग साधे रस्त्यावरचे सूचना फलक नाही का वाचता येत?

अरे मानवा, हे सूचनाफलक कशासाठी लावले आहेत. आमची निर्मिती तुम्हांलाच संकटातून वाचवण्यासाठी झाली आहे. त्याचा उपयोग करा हे सांगण्याची पाळी आमच्यावरच यावी यासारखी दु:खाची बाब नाही.

अरे, आम्हांला रंगरंगोटी करून रस्त्यांवर लावले जाते ते केवळ शोभेसात्थी नव्हे. त्यावर लिहिलेला संदेश वाचा. त्यानुसार आचरण करा तरच तुम्ही व इतर लोकही सुरक्षित राहतील.

बाबांनो वाहने चालवताना ती हळू चलवा. 'अति घाई संकटात नेई' म्हणतात ते उगाच नाही, वेलेपेक्षा दहा मिनिटं लवकर निघा रे. घाटात मी उभा असतो 'पुधे एक किलोमीटरचा घात आहे.' यासूचनेसह. ती वाचा व वेग कमी करून सुरक्षित प्रवास करा हाच माझ्या निर्मितीमागील विचार आहे. अरे मानवा 'गरज पडेल तेव्हा सतत कर्णभोंगा वाजवा', 'गतिरोधकावर वाहनाची गती कमी करा' या सूचना तुमचे प्राण वाचवतील याची हमी मी देतो.

आजकाल तर तुमच्या (मोबाईलने) भ्रमणध्वणीने कित्येकांचे जीव घेत्तले असतील. जर भ्रमणध्वनीने कित्येकांचे जीव घेतले असतील. जर भ्रमणध्वनीवर बोलायचे असेल, तर गाडी बाजूला थांबवून बोला. अन्यथा गाडी चालवता भ्रमणध्वनी बंद करून ठेवा. त्याने तुमचे व समोरच्याचेही प्राण वाचवतात. बाबांनी लक्षात ठेवा, 'नाही पेक्षा उशीर बरा!' त्यामुळे या सूचना वेळोवीळी पाळा व अपघात कायमचे टाळा.

बाळांनो माझ्याकडे हात – पाय असते ना, तर येणा-या या संकटांपासून मीच तुम्हांला वाचवले असते; पण माझ्याकडे फक्त तुम्हांला एका जागी उभे राहून सूचना देण्यापलीकडे काही नाही. माझ्या अस्तित्वाला तुम्ही अर्थ दया आणि यासूचना पाळा व निरपराधांचे व स्वत:चेही प्राण वाचवा ही विनंती.

चला, मला माझे काम करत्त राहू दे. तुम्ही तुमच्या कर्तव्यांकडे डोळेझाक करता; पण मला करून चालणार नाही; मात्र कोणीतरी मला वाचेल व त्यामुळे त्याचा जीवही वाचेल. अशी आशा करत्तो. चला

३) **परिक्षा नसत्या तर.........**

विदयार्थ्यांच्या जीवनात परीक्षांना अतिशय महत्त्व आहे. एका इयत्तेत चार चाचण्या व दोन सत्र परीक्षांमुळे विदयार्थ्यांना थोडीसुद्धा सुटका मिळत नाही. एक परिक्षा संपते ना संपते तोच दुसरी परीक्षा येत असते. जर अशा जीवघेण्या परीक्षाच नसत्या तर विदयार्थ्यांच्या डोक्यावरील चिंतेचा भार कमी होईल, त्यांना अतिशय आनंद होईल.

त्यांना कोणी पुस्तकी किडा म्हणणार नाही. ते निश्चिंत होऊन सिनेमा पाहू शकतील, संम्मेलन आणि समारंभात भाग घेऊ शकतील आणि आनंदाने झोपू शकतील.

आजची परीक्षा - पद्धती सुद्धा किती विचित्र आहे? इतक्या मोठ्या अभ्यासक्रमाची परीक्षा मात्र फक्त तीन तासातच घेतली जाते. त्याचा परिणाम म्हणजे विदयार्थी परीक्षेच्या दृष्टिकोनातूनच अभ्यास करतात. काही विदयार्थी तर केवळ महत्त्वाचे प्रश्न तोंडपाठ करून पास होतात. जर अशी परीक्षा पद्धती नसती तर तो विदयार्थी त्या विषयाचे सखोल ज्ञान मिळवण्याचा प्रयत्न करू शकेल आणि खऱ्या अर्थाने विद्वान होईल.

जर परीक्षा नसत्या तर या महागाईच्या दिवसात सर्वसामान्य लोकांना काटकसर करून आपल्या मुलांना शिकवणी लावावी लागणार नाही. शिक्षकांनाही विदयार्थ्यांच्या उत्तर-पत्रिका तपासायला तास-न्-तास बसावे लागणार नाही. विदयार्थ्यांना परीक्षेचे महत्त्वाचे प्रश्न विचारण्यासाठी, कॉपी करण्याची वेळच येणार नाही.

परंतु परीक्षा नसत्या तर कोणत्या आधारावर विदयार्थ्यांना एका इयत्तेतून दुसऱ्या इयत्तेत जाता येईल? परीक्षा पास झाल्यास आनंद उपभोगता येईल का? याउलट परीक्षा नसत्या तर विदयार्थी अभ्यासाबाबत बेपर्वाईने वागतील. म्हणूनच मला परीक्षा असाव्यात असे वाटते.